**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – नामदेव झुन्नुजी टेकाम

वय – ४९ वर्ष, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.नं १११११

राहणार – पोलीस मुख्यालय, नागपूर

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एम.एम.पंचारीया यांच्यातर्फे</u>**

१. दिनांक ०२.०५.२०१९ रोजी मी एनपीसी या पदावर गुन्हेशाखा युनीट क्र.५ नागपूर येथे कार्यरत होतो. माझ्या ड्युटीचा वेळ सकाळी १०.०० पासून सुरु होतो. त्यादिवशी रात्री ९.१५ वाजता पीएसआय संजय मिश्रा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की कळमना कामठी येथे २०–२० क्रिकेटवर सट्टा लावला आहे. त्यानंतर पीएसआय मिश्रा यांनी दोन पंचाना बोलविले. त्यानंतर आम्ही सरकारी वाहनाने घटनास्थळी लॅपटॉप, प्रिंटर, पंच व पोलीस स्टाफ यांना घेवून रवाना झालो. त्यानंतर आम्ही कळमना टी पॉईंट येथील सिंधी चाळ समोर कश्यप बिल्डींगजवळ रात्री ९.४५ वाजता पोहोचलो. त्या बिल्डींग मधील तिस–या माळ्यावर आम्ही गेलो असता एका रुममध्ये दोन इसम टिव्हीवर सनराईझ हैदाराबाद व मुंबई इंडीयन्स यांच्या क्रिकेट मॅचवर मोबाईलवर लोकांशी संपर्क साधून हारजीतचा खेळ खेळत असताना दिसून आले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष सट्टे लिहीलेल्या चिठ्ठया, टिव्ही, एक डॉट पेन, सेटऑपबॉक्स, कुलर, तीन मोबाईल व रिमोर्ट जप्त केले. त्यानंतर तेथे उपस्थीत असणा–या दोन इसमांना पीएसआय मिश्रा यांनी त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अभिमन्यु शर्मा व सर्वेश्वर कश्यप असे सांगितले. त्यानंतर पीएसआय मिश्रा यांनी घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर आम्ही आरोपींना घेवून नवीन कामठी पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर पीएसआय मिश्रा यांनी आरोपींविरुध्द फिर्याद दिली व आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी सर्वेश्वर कश्यप आज हजर आहे, दुसरा आरोपी गैरहजर आहे.

**सरतपास पूर्ण**

सं.फौ.ख.क्र.८५८/२०१९
सरकार वि. अभिमन्यु वगैरे
निशाणी क्र. १२ खाली

**<u>उलटतपास आरोपीं तर्फे वकील श्री.पंकज यादव यांच्यातर्फे.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की कळमना टि पाईंट येथील रोडच्या बाजुला लोकवस्ती व दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक घराचे मालमत्ता क्रमांक वेगवेगळे असतात. कश्यप बिल्डींगमधील ज्या रुममध्ये आम्ही गेलो होतो त्याचा मालमत्ता क्रमांक मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यावरील दोन्ही पंच नागपूरचे आहेत, घटनास्थळावरील नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे वरीष्ठ पीएसआय मिश्रा यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही घटनेच्या वेळी सरतपासात सांगितल्या प्रमाणे साहित्य जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.08.02 17:45:58 +0530

ठिकाण –कामठी **(रा.र. शेरेकर)**
दिनांक –०२/०८/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र.२, कामठी.